RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ३४(२)] मंगळवार, मार्च २८, २०२३/चैत्र ७, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ मार्च, २०२३.

### अधिसूचना

**वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९.**

क्रमांक वैमाशा-२०२२/प्र.क्र.११३/ग्रासं-३.—शासन अधिसूचना समक्रमांक दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ अन्वये वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा १) च्या कलम १४ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून वैध मापनशास्त्र अधिकारी यांना त्यांचे विहित अधिकार व त्यांचेवर सोपविण्यात आलेली कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांचे स्थानिक कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. सदर अधिसूचनेमध्ये विवरणपत्रामध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहेत :—

(१) शासन अधिसूचना क्रमांक वैमाशा-२०२२/प्र.क्र.११३/ग्रासं-३, दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ मधील रकाना क्र. २ मध्ये ज्या ठिकाणी 'सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र' किंवा 'निरीक्षक, वैध मापनशास्त्र' यापैकी कोणत्याही एका पदनामाचा उल्लेख केलेला आहे त्या ठिकाणी 'निरीक्षक/सहायक नियंत्रक, वैध मापनशास्त्र' असे वाचावे.

(२) अनु.क्र. ३७ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'मुंबई जिल्हा क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(३) अनु.क्र. ३८ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'संजीव कॅलिब्रेशन सेंटर, एचपीसीएल व बीपीसीएल कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(४) अनु.क्र. ४७ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'मुंबई जिल्हा क्र. २ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन तसेच या कार्यक्षेत्रातील फ्लो-मीटरची पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(५) अनु.क्र. ४८ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'धुमाळ कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(६) अनु.क्र. ५७ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'मुंबई जिल्हा क्र. ३ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन तसेच या कार्यक्षेत्रातील फ्लो-मीटरची पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(७) अनु.क्र. १२१ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'पुणे जिल्हा क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(८) अनु.क्र. १२५ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'एचपीसीएल कॅलिब्रेशन सेंटरवर तसेच भविष्यात पुणे जिल्हा क्र. २ च्या कार्यक्षेत्रात नव्याने होणाऱ्या कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन व एचपीसीएल, आयओसीएल व बीपीसीएल कंपनीतील वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(९) अनु.क्र. १२६ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'परफेक्ट कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१०) अनु.क्र. १२७ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या भौगौलिक कार्यक्षेत्राऐवजी 'पुणे जिल्हा क्र. २ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(११) अनु.क्र. १३९ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या भौगौलिक कार्यक्षेत्राऐवजी 'पुणे जिल्हा क्र. ३ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१२) अनु.क्र. १४६ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या भौगौलिक कार्यक्षेत्राऐवजी 'पुणे जिल्हा क्र. ४ च्या कार्यक्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१३) अनु.क्र. १६० स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद भौगोलिक क्षेत्रानंतर 'मार्केट यार्ड, सांगलवाडी ते मिरज रस्त्याचा उत्तर भाग मार्केट यार्ड पर्यंत' हे भौगौलिक क्षेत्र समाविष्ट करण्यात येत आहे.

(१४) अनु.क्र. १७१ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद 'वाहनटाकी' या शब्दाऐवजी 'पी.एस.पाटील कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१५) अनु.क्र. १८४ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद 'माढा तालुका व करमाळा तालुका' ऐवजी 'करमाळा तालुका व माढा तालुका' असे वाचावे.

(१६) अनु. क्र. १८७ स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद भौगोलिक क्षेत्रानंतर 'दक्षिण सोलापूर तालुका' हे भौगोलिक क्षेत्र समाविष्ट करण्यात येत आहे.

(१७) अनु.क्र. २०० मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद कार्यक्षेत्राऐवजी 'मनमाड विभाग कार्यक्षेत्रातील सर्व वाहनटाकी कॅलिब्रेशन सेंटरवर येणाऱ्या सर्व वाहनटाक्यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१८) अनु.क्र. २१५ मधील स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'धुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व वजन वा माप उत्पादकांकडील नवीन वजन वा माप यांचे पडताळणी व मुद्रांकन' असे वाचावे.

(१९) अनु.क्र. २२४ मधील स्तंभ क्र. (३) मधील 'जळगांव ग्रामीण तालुका' ऐवजी 'जळगांव तालुका' असे वाचावे.

(२०) अनु .क्र. २५० स्तंभ क्र. (२) मध्ये 'उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, परभणी' या ऐवजी 'उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र परभणी-हिंगोली' असे वाचावे.

(२१) अनु.क्र. २७७ स्तंभ क्र. (२) मध्ये 'उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, अकोला' या ऐवजी 'उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र , अकोला-वाशिम' असे वाचावे.

(२२) अनु.क्र. २८६ स्तंभ क्र. (३) मधील 'झरी जामणी तालुका' ऐवजी 'झरी जामणी तालुका (पाटण शिबीर वगळून)' असे वाचावे.

(२३) अनु.क्र. २९२ स्तंभ क्र. (३) मध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्राऐवजी 'बुलढाणा तालुका, (रायपूर-सैलानी शिबीर वगळून), मलकापूर तालुका, मोताळा तालुक्यातील शेलापूर शिबीर' असे वाचावे.

(२४) अनु.क्र. ३०० मधील स्तंभ क्र. (३) मधील 'नागपूर' हा शब्द वगळण्यात येत आहे.

२. नियंत्रक, सह नियंत्रक, उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र यांना त्यांच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादित त्यांच्या अधिपत्याखालील कोणत्याही वैध मापनशास्त्र अधिकाऱ्यास त्याच्या कार्यक्षेत्राबाहेर वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचे अधिकार असतील.

३. शासन अधिसूचना क्रमांक वैमाशा-२०२२/प्र.क्र.११३/ग्रासं-३, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ मध्ये ज्या ठिकाणी 'औरंगाबाद' असा उल्लेख आहे त्या ठिकाणी 'छत्रपती संभाजीनगर' असे वाचावे व ज्या ठिकाणी 'उस्मानाबाद' असा उल्लेख आहे त्या ठिकाणी 'धाराशिव' असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चारुशीला तांबेकर,**
शासनाच्या सहसचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.